8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282









**रामनवमीनिमित्त जालना येथील गांधी चमन पासून भव्य शोभा यात्रा व विविध देखावे सादर करण्यात आले. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार अर्जुन खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत व इतर मान्यवर उपस्थित होते. शोभायात्रेत श्रीराम मुर्तीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. ढोल-ताशे, मल्लखांब व विविध देखाव्यांनी शहरवासियांचे लक्ष वेधले. (छायाचित्र - किरण खानापुरे व जावेद तंबोली)**

## शोभायात्रेत डफड्याच्या तालावर दानवे-खोतकरांनी ठेका धरला



**जालना । प्रतिनिधी -** राम भक्तीच्या जल्लोषात आणि उत्साहात जालना शहरात राम नवमी निमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. या शोभायात्रेत भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे आणि शिवसेनेचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी एकत्रित सहभाग घेत डफड्याच्या तालावर ठेका धरत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

शहरातील गांधी चमन येथून सुरू झालेली ही शोभायात्रा बडीसडक येथील राम मंदिरापर्यंत मोठ्या उत्साहात काढण्यात आली. भगवे झेंडे, ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वेशभूषा आणि ''जय श्रीराम''च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

या शोभायात्रेतील सर्वात आकर्षणाचा क्षण म्हणजे रावसाहेब दानवे आणि अर्जुनराव खोतकर यांनी डफड्याच्या तालावर घेतलेला ठेका. राजकीय क्षेत्रातील भिन्न पक्षांचे प्रतिनिधित्व करत असले तरी धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात दोघेही एकत्र सहभागी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या शोभायात्रेत हजारो हिंदू बांधवांनी सहभाग घेतला. विविध मंडळांनी आकर्षक देखावे सादर केले होते. महिला, युवक आणि बालकांचा सहभागही लक्षणीय होता. संपूर्ण मार्गावर फुलांची उधळण, आरती आणि स्वागत करण्यात आले.

यावेळी जालना महानगरपालिकेचे महापौर मगरे, उपमहापौर राजेश राऊत, युवा सेनेचे राज्य सचिव अभिमन्यू खोतकर, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, तसेच अश्विन आंबेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

पोलीस प्रशासनाच्या बंदोबस्तात ही शोभायात्रा शांततेत व सुरळीत पार पडली. शहरात कोणताही अनुचित प्रकार घडला नसून नागरिकांनीही संयम राखत उत्सवाचा आनंद लुटला.

राम नवमीच्या या निमित्ताने जालना शहरात धार्मिक एकात्मतेचे आणि सांस्कृतिक उत्सवाचे सुंदर दर्शन घडले.

## राम नवमी निमित्त आमदार बबनराव लोणीकर यांचा शुभेच्छा संदेश; अयोध्येतील राम मंदिराचा गौरव

**जालना । प्रतिनिधी -** श्री राम नवमीच्या पावन निमित्ताने आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्ह्यातील तसेच राज्य व देशातील सर्व नागरिकांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या निमित्ताने त्यांनी प्रभू श्रीरामांच्या आदर्श जीवनाचा उल्लेख करत समाजाला एकात्मतेचा संदेश दिला.

लोणीकर म्हणाले की, प्रभू श्रीरामांचा जन्म अयोध्येत झाला असून तेथे आज भव्य राम मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरासाठी अनेक वर्षे संघर्ष करण्यात आला आणि सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून हे मंदिर साकार झाले, असे त्यांनी नमूद केले.

प्रभू श्रीराम हे या देशाचे आदर्श राजा होते. त्यांच्या राज्यकारभारात न्याय, धर्म आणि प्रजेची काळजी यांना सर्वोच्च स्थान होते. जगात त्यांच्या सारखा आदर्श राजा होणे अशक्य असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी यावेळी काढले.



राम नवमीचा उत्सव देशभरासह जगभरात मोठ्या उत्साहात साजरा होत असल्याचे सांगत लोणीकर यांनी परतूर व मंठा येथे भव्य मिरवणुका आयोजित करण्यात आल्या असल्याची माहिती दिली. ते स्वतः दरवर्षी या मिरवणुकांमध्ये सहभागी होत असून वाटूर येथील ऐतिहासिक राम मंदिरालाही भेट देत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेवटी त्यांनी सर्व नागरिकांना राम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा देत सुख, समृद्धी आणि शांततेसाठी प्रार्थना केली.



**जालना येथील आरपी रोड येथील श्रीराम मंदिरात रामनवमीनिमित्त महाआरती व गर्भ ग्रहाचे असे पुष्पाद्वारे आकर्षक अशी सजावट करण्यात आली यावेळी भगवान श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. (छायाचित्र जावेद तंबोली)**

# संपादकीय पान

## प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालात भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून मुंबई दिल्लीसह देशातील सर्वच महानगरे आणि मोठी शहरे प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३४ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, बेगुसाराई, गुवाहाटी, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

## पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध; नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये - केंद्र सरकार

**नवी दिल्ली -** देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या टंचाईबाबत सुरू असलेल्या चर्चांदरम्यान केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिलं आहे. पेट्रोलियम मंत्रायलाने स्पष्टपणे सांगितले की देशातील इंधन पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असून परिस्थिती नियंत्रणात आहे. सरकारने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन केलं आहे. तसेच देशातील सर्व पेट्रोल पंप आणि वितरण केंद्रांवर पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहितीही सरकारने दिली.

पेट्रोलियम मंत्रालयाच्या माहितीनुसार, देशात कुठेही पेट्रोल, डिझेल किंवा ची कमतरता नाही. सर्व रिटेल फ्युएल आउटलेट्सकडे पुरेसा साठा उपलब्ध असून वितरण सुरळीत सुरू आहे. पुरवठा साखळी मजबूत असून कोणत्याही प्रकारचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता सध्या नाही.

**अफवांपासून सावध राहा, सरकारचं आवाहन**

सरकारने नागरिकांना इशारा दिला आहे की, काही ठिकाणी जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवून भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा अफवांपासून दूर राहावे आणि केवळ अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा, असं मंत्रालयाने म्हटलं आहे.

मंत्रालयाने स्पष्ट शब्दांत सांगितल की नागरिकांनी अनावश्यक साठेबाजी करू नये. पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरवठा सुरळीत सुरू असल्यामुळे कोणत्याही प्रकारची घाई किंवा घबराट करण्याचे कारण नाही. जागतिक पातळीवर सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्याबाबत चिंता व्यक्त होत असली, तरी भारताने परिस्थितीवर नियंत्रण ठेवलं असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

# अशोक खरात या नराधमाला फाशीची शिक्षा व मदत करणाऱ्या दिग्गजांना कठोर शिक्षा होईल का?

महाराष्ट्राच्या इतिहासातील अशोक खरात या नालायक नराधमाने विकृतीची हद पार करून भयावह कृत्य केले आहे ज्याची कल्पना करणे कठीण आहे आणि ही आता महाराष्ट्राची एपस्टीन फाईल्स झाली आहे.त्यामुळे ही संपूर्ण चौकशी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून व्हायला पाहिजे.असे वाटते की भोंदूबाबा अशोक खरात त्यांना मदत करणारे राजकीय पुढारी यांनी आतापर्यंत डोळ्यांवर पट्टी का बांधली होती?खरात सोबत दिर्घकाळ चर्चा करणारे राजकीय पुढारी यांना खरातच्या कुकृत्याची खबर कशी काय लागली नाही? त्याच्या जवळ व त्यांच्या सहकाऱ्यांजवळ करोडोंची संपत्ती आली कोठून?खरातला खतपाणी कोण घालायचे? असे अनेक प्रश्न आज सर्वसामाण्यांच्या मनात भेडसावत आहे.आज आपण मिडियाच्या माध्यमातून पहातो की नालायक अशोक खरात सोबत अनेक दिग्गज नेत्यांचे फोटो आहेत.याचाच अर्थ असा की,या दिग्गज राजकीय पुढाऱ्यांचा अशोक खरात सोबत कुठेतरी काहीतरी अवश्य संबंध असायलाच पाहिजे.रुपाली चाकणकर ह्या महिला आयोगाच्या जबाबदार अध्यक्षा होत्या.महिला आयोगाचे पद महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व अत्याचाराच्या दृष्टीकोनातून निराकरण करण्यासाठी निर्णय देणारे उच्च पद आहे जेणेकरून पिडित महिलांना योग्य न्याय मिळावा व समाजात सर्व काही सुरळीत रहावे.परंतु रूपाली चाकणकर यांनी महिलांना न्याय देण्याचे सोडून अशोक खरात सारख्या भोंदू बाबाच्या नांदी लागुन व त्यांचे पाय धुवून अनेक महिलांचे वाटोळे केले.रूपाली चाकणकरांचे काम झाले की,लोका सांगे ब्रह्मज्ञान व स्वतः कोरडे पाषाण.आपण पहातो की मिडियाच्या माध्यमातून अशोक खरात याचे १०० हुन अधिक अश्लील व्हिडिओ सामोर आले आहेत यावरून आपण समजू शकतो की खरात यांची विकृती किती शिगेला पोहोचली होती आणि खालच्या स्तरावर जावून ठेपली होती आणि अशा नराधमाचे पाय सुरक्षित माजी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर धुतात आणि राजकीय पुढारी त्यांच्या पायापडतात ही कीती शरमेची आणि लाजिरवाणी बाब आहे.मी तर म्हणेल की, ज्या-ज्या राजकीय पुढाऱ्यांचे घनिष्ठ संबंध होते अशा सर्वांनाच सरकारने सह आरोपी बनवायला पाहिजे .कारण खरातनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला कलंकित केले आहे.त्याचप्रमाणे अशोक खरात सोबत ज्या -ज्या दिग्गज नेत्यांचे फोटो किंवा बैठका झाल्या आहेत त्यांचीही चौकशी होणे गरजेचे आहे. कारण अशोक खरात विकृत होताच परंतु सेक्स रॅकेट चालवायचा का? याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे एखाद्या गुन्हेगारासोबत सर्वसामान्य व्यक्तीचा फोटो असतो अशा परिस्थितीत पोलीस विभाग सर्वसामान्य व्यक्तीची कसून चौकशी करीत असतो वेळ पडल्यास तुरूंगात सुद्धा टाकतो. अशाचप्रकारे अशोक खरात सोबत संबंध असणारे व त्यांच्या सोबत फोटोत असणारे या सर्वांचीच कसुन चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण विकृतीची सिमा ओलांडणारा खरात यांच्या जवळ करोडोंची संपत्ती आली कोठून याची चौकशी करण्यासाठी त्यांच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी आवश्यक आहे. खरात हा राज्यासह देशाचा मोठा गुन्हेगार आहे, महिलांचा गुन्हेगार आहे,पिडीतांचा गुन्हेगार आहेत, सर्वसामान्यांचा गुन्हेगार आहे आणि अनेकांची संपत्ती हडपण्याचे काम खरात यानी केले आहे त्यामुळे त्याच्याशी संबंध ठेवणाऱ्या सर्वच राजकीय पुढाऱ्यांची चौकशी होणे गरजेचे आहे तेंव्हाच सत्य सामोर येईल. कारण खरातच्या या प्रकरणावरून असे लक्षात येते की,यात मोठमोठे मासे अडकु शकतात यालाही नाकारता येत नाही.आपण जेव्हा समान कायदा किंवा समान अधिकार म्हणतो तेव्हा खरातच्या केसमध्ये सर्वांनीच खुलुन सुरक्षा विभाग,पोलीस विभाग यांना सर्वतोपरी सहकार्य करने आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्या-ज्या महिलांवर अत्याचार झाले आहेत किंवा खरातनी ब्लॅकमेल करण्याचे प्रयत्न केले आहे अशा सर्वांनी पोलीस यंत्रणेला मदत करून या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश केला पाहिजे जेणेकरून असे घृणास्पद कृत्य भविष्यात कोणीही करू शकणार नाही.भोंदू खरातने नरबळी व पशुबळी दिल्याचेही सांगितले जाते त्यामुळे खरात विकृत,नालायक आहेच सोबतच सर्वसामान्यांचा मोठा हत्यारा सुध्दा आहे. त्यामुळे त्याच्या सोबत असणाऱ्यांचा किंवा फोटोंमध्ये असणाऱ्यांची कसून चौकशी व्हायलाच पाहिजे तेव्हाच दुध का दुध पाणी का पाणी होईल.राजकीय पुढारी प्रथम खरातला भेटले तेव्हा चांगले बाबा होते आणि आता भोंदूबाबा म्हणतात याची लाज व शरम खरातला भेटणाऱ्या राजकीय पुढारी व सेलिब्रिटीला वाटायला पाहिजे.यावरून स्पष्ट होते की, राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी आणि अस्तित्वासाठी भोंदूबाबांना सुध्दा जवळ करतात. खरातने शेतकऱ्यांची जमीन लुबाडली धरणाचे पाणी आपल्या शेतात वळवते केले तेव्हा राजकीय पुढारी खरातच्या पायाशी लोळत होते आणि आता भोंदूबाबा म्हणून पळ काढण्याचा प्रयत्न राजकीय पुढारी करीत आहे ही बाब सामान्य माणूस व कायदा कदापि सहन करणार नाही.जोपर्यंत भोंदूबाबा प्रकरणात राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई किंवा चौकशी होत नाही तोपर्यंत समाजाला व सर्वसामान्यांना योग्य न्याय मिळणार नाही.खरातचे आता जेवढे काही व्हिडिओ व्हायरल झाले आहेत ते फक्त ५० टक्के असावेत यापुढे आणखी मोठा उलघडा होऊ शकतो.कारण खरात राजकीय पुढाऱ्यांच्या मदतीने सेक्स कैन्डलसह अनेक कारनामे करीत असावेत अशीही शंका निर्माण होत आहे,याचाही खुलासा व्हायला हवा. राज्याची सुरक्षा यंत्रणा,पोलीस यंत्रणा व एसआयटी सह स्थानिक पोलिस यंत्रणा अत्यंत शिताफीने कार्य करीत आहेत आणि त्यांचे कार्य प्रशंसनीय आहे.अशा परिस्थितीत सरकारने, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, राजकीय पुढारी यांनी सुरक्षा यंत्रणेला सर्वतोपरी सहकार्य केले पाहिजे. ज्या-ज्या राजकीय पुढाऱ्यांचे खरात सोबत चर्चा करतांनाचे फोटो आहेत त्यांना सुध्दा सह आरोपी बनवून कारवाई केली पाहिजे.खरातला खतपाणी घालण्याचे काम राजकीय पुढाऱ्यांनीच केले आहे त्यामुळे खरातने आपल्या घृणास्पद कृत्यावर पकठ मजबूत ठेवली होती आणि आज उघडकीस आले तर सर्वच राजकीय पुढारी खरातच्या केसपासुन भोंदूबाबा म्हणून हात झाडण्याचे काम करीत आहेत हे राज्याचे दुर्भाग्य आहे.मी सरकारला विनंती करतो की महाराष्ट्राला खरातच्या कलंकापासुन वाचविण्यासाठी अशोक खरातची फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चौकशी करून संपूर्ण उलघडे करावेत व लवकरात लवकर अशोक खरातच्या गळ्यात फाशीचा दोर पडावा सोबतच खरात सोबत संबंध ठेवणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# सकल सुखाचा सागर राम

चैत्र शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला साजरी होणारी रामनवमी केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच महत्त्वाची नाही तर सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. प्रभू श्रीराम आपल्याला नेहमीच सत्य, न्याय आणि धर्माच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतो.

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र हे आपल्या भारतीय संस्कृती आधारस्तंभ आहेत. प्रत्येकाच्या हृदयात ते विराजमान आहे.

.त्यांचे जीवन म्हणजे संपूर्ण राष्ट्राला त्यांनी जगण्याचा मार्ग दाखवलेला आहे. संसारात राहून सामाजिक, नैतिक, कौटुंबिक, आणि राजकीय मर्यादा पाळून पुरुष सदाचरणी राहू शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रभू श्री रामचंद्र. हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यात चैत्र शुध्द नवमीस प्रभू रामाचा जन्म झाला.त्या दिवशी सर्व ठिकाणी रामनवमीचा सोहळा उत्साहात साजरा केला जातो.मंदीरांना रंगरंगोटी केली जाते.समोर. सभा मंडप उभारले जातात.रंगीबेरंगी पताका लावल्या जातात. विद्युत रोषणाई केली जाते. संपूर्ण देशभरात रामनवमी उत्साहात साजरी केली जाते.अयोध्ये पासून ते रामेश्वर पर्यंत हा सोहोळा साजरा होतो.आपल्या संस्कृतीत हा दिवस अतिशय महत्वाचा मानला जातो.

पंचांगानुसार, चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील नवमी तिथी या वर्षी २६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११:४८ वाजता सुरू होईल आणि २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:०६ पर्यंत असणार आहे, म्हणूनच रामनवमीचा उत्सव वेगवेगळ्या परंपरेनुसार वेगवेगळ्या दिवशी साजरा केला जातो. स्मार्त परंपरेनुसार, रामनवमी २६ मार्च २०२६ रोजी साजरी केली जाईल, तर उदयतिथीचे पालन करणारे वैष्णव भक्त २७ मार्च २०२६ रोजी भगवान राम यांची जयंती साजरी करतील.

माध्यान्य काळी सुर्य डोक्यावर येतो तेव्हा ठीक बारा वाजता राम जन्माचा सोहळा साजरा करतात. त्याआधी रामजन्मावर आधारित कीर्तन, प्रवचन होते.ते बरोब्बर बारा वाजता संपताच, गुलाल उधळून, जयजयकार केला जातो,वाजंत्री वाजते. फटाके फोडले जातात.बत्ताशांची उधळण होते. हा प्रसाद मिळवण्यासाठी हजारो भाविक गर्दी करतात. पाळणा हलवला जातो. काही ठिकाणी जन्माचा पाळणाही म्हणतात. रामाची आरती करुन, बत्तासा,सुंठ धणे गुळाचा प्रसाद सुंठ वडा, (,त्याला पंजिरी, म्हणतात) वाटला जातो.

रामनवमीच्या उत्सवाची सुरूवात काही मंदिरात गुढीपाडव्या पासून होते, तर काही मंदिरात रामनवमी पासून पुढे आठ दिवस कार्यक्रम होतात. या काळात नैमित्तिक भजन, कीर्तन, प्रवचनाचे कार्यक्रम असतात. काही विशेष कीर्तनकारांची, प्रवचनकारांचे, कार्यक्रमांचेही खास आयोजन केले जाते. गीत रामायणकार ग.दी. माडगूळकर,आणी गायक सुधीर फडके (बाबूजी)यांनी गीतरामायण हा कार्यक्रम अजरामर केला. गीत रुपाने रामायणातील प्रसंग त्यानी आपल्या गीतातून डोळ्या समोर उभे केलेत.अनेक ठिकाणी गीतररामायणाचे कार्यक्रमाच आयोजन आठवडाभर केल जात.

श्रोते मंडळींना ह्या काळात ही खास मेजवानीच असते.

श्रीरामास भगवान श्री विष्णूचा सातवा अवतार समजला जातो.देवता आणि अवतार यांच्या जन्मदिवशी त्यांचे तत्व भूतलावर अधिक प्रमाणात कार्यरत असते.श्री रामही अवतारी देवता असल्यामुळे श्रीराम नवमीला श्रीराम तत्व हे हजार पटीने कार्यरत असल्याचे मानले जाते. म्हणून ह्यादिवशी श्रीरामरक्षा पाठ,श्रीराम जय राम जय जय राम.ह्या मंत्राचा जप, केल्याने अधिक पटीने लाभ मिळत असतो. म्हणून अनेक मंदिरात राम नाम जपाची बारी लावून अखंड जप केला जात असल्याचे दिसते. गुढीपाडवा ते रामनवमी ह्या काळात दररोज १३ वेळा रामरक्षा स्तोत्र श्रद्धापूर्वक म्हटल्यावर



ते सिद्ध होते.रामरक्षेत प्रत्येक अवयवांचे साठी स्वतंत्र श्लोक आहे.त्यामुळे त्या त्या अवयवांचे विकार बरे होतात..

राम रक्षा पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।
शिरो मे राघवः पातु भालं दशरथित्मजः ।।
कौसल्येयो दृशौपातु विश्वामित्रप्रियः श्रुती ।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ।
जिह्वां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितनः ।
स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ।।
करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजितः ।
मध्यं पातु खरध्वंसी नाभि जाम्बवदाश्रयः ।।
सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।
उरु रघुत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ।।
जानुनी सेतुकृत्पातु जंघे दशमुखान्तकः ।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोखिलं वपुः ।।

असे कवच या रामरक्षा स्तोत्रात आलेले आहे. कवच म्हणजे आपल्या प्रत्येक अवयवाचे रक्षण करण्यासाठी मंत्र धारण करणे.

पातालभूतलव्योम चारिणश्छद्मचारिणः।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ।।

पाताळ भूमी आणि आकाश या तिन्ही लोकांत संचार करणारे छद्मचारिणः म्हणजे राक्षस राम नावाने रक्षलेल्या लोकांकडे नजर वर उचलून पाहू शकत नाही.

म्हणूनच रामरक्षा,। रामस्तुतीचे पठण,. हनुमानाचे हनुमान चालीसा पठण, राम नामाचा जप, रामचरितमानसाचे पठण,. केल्याने संकट निवारण होते दुःखापासून मुक्ती मिळते मनोकामना पूर्ण होतात सुख-समृद्धी होते.

रामरामेति रामेति
रमे रामे मनोरमे ।
सहस्त्रनाम तत्तुल्यं
रामनाम वरानने ।।

उत्सव काळात मंदिरातील मूर्तीला, विविध प्रकारचे पोषाख, फुलांचे हार चढवले जातात. तसेच ह्याच काळात काही शहरात एक दिवस रथयात्रेच आयोजन असते.रथातून श्रीरामाची नगर प्रदक्षिणा असते.सकाळी साडेसात -आठ वाजता रथयात्रेस प्रारंभ होतो.रथाला दोर लाउन रथ ओढला जातो.प्रदक्षिणेच्या मार्गावर घराघरातून आरती,(त्याला कानगी म्हणतात. त्यात बत्ताशे, पाच खारका ,आणि संस्थानला देणगी रुपात काही रक्कम असते.) दिली जात असते. आपल्याला त्यांच्याकडून बत्तासे आणि पंजीरीचा प्रसाद मिळतो. उन्हाची पर्वा न करता ढोल-ताशा,लेझीम पथक उत्साहानं लेझीम खेळत असतात. काही ठिकाणी बाहेर गावाहून लेझीम पथक बोलावली असतात.गोफ पथक असतात. संध्याकाळी साडेपाच -सहा वाजता रथयात्रा स्थानी पोहचते. उत्सवाचेच काळात पालखीतूनही श्रीरामाची नगर प्रदक्षिणा होते.

अनेक ठिकाणांच्या उत्सवातून दशावतार(अनेकदा यांना दशावतारी सोंग) काढले जातात.माणंसच मुखवटे धारण करुन नाचतात.प्रत्येक अवतार प्रगट होतांना फटाके फोडले जातात आणि तो अवतार प्रकट होतो.वाद्यांच्या तालावर ते नाचतात. एकेक अवतार साधारणपणे पंधरा-वीस मिनिटे ते अर्धा तास नाचतो. त्यात, मत्स्यावतार,देवी, खंडोबा,नारसिंह, राजा, महिषासुर असे अनेक प्रकार असतात.अनेक वर्षा पासूनची ही प्रथा चालत आली होती. ती प्रथा आता बंद पडली आहे.

जळगाव भागात,जळगाव येथे चिमुकले राम मंदिर, जुन्या जळगावातील राममंदिर, जामनेर येथील नगारखाना भागातील राममंदिर, येथे मंत्री गिरीश महाजन यांचे उपस्थितीत कार्यक्रम होतात., शेंदुर्णि येथील राममंदिर, नासिक येथील काळाराम मंदिर, पुण्याच्या तुळशीबागेतील पेशवेकालीन राममंदिर, गोंदवले येथील थोरले व धाकटे राममंदिर , श्री गजानन महाराज संस्थान शेगाव, मुंबई, ठाणे, नागपूर, छ.संभाजी नगर, शिर्डी, आळंदी, अक्कलकोट, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी रामजन्म धूमधडाक्यात साजरा होतो.

सत्संगाचा सुगंध राम,कैवल्याची मुर्ती राम,चराचरातील स्फुर्ती राम,कर्तव्याचे पालन राम,सकल सुखाचा सागर राम,आदर्शाचा आदर्श राम,एकवचनी हा देव महान,अशा अनेक विशेषणांनी प्रभु श्रीरामाचे वर्णन केल आहे.

नैतिक, राजकीय -सामाजिक, कोटुंबिक, मर्यादेच उल्लंघन न होऊ न देता पुरूष उत्तम कसा असतो ह्याच उदाहरण म्हणजे ''मर्यादा पुरुषोत्तम राम''हे आहे.रामाचे संपूर्ण जीवनच मार्गदर्शक स्त्रोत आहे.एक कोटुंबिक आदर्श आहेत.मातृ-पितृ भक्ति अनुकरणिय आहे.

आजही ग्रामीण भागात एकमेकांशी गाठभेट झाल्यास हात जोडून ''रामराम'' म्हणायची पद्धत आहे.तो एक संस्कार आहे. चांगल्या राज्याची संकल्पना म्हणून रामराज्य शब्द प्रचलित आहे...रामराज्य येऊन जनता सुखी होईल अशी नेहमीच आपण सर्व अपेक्षा करत असतो...

प्रभू श्री रामचंद्र एक आदर्श पुरुष तर होतेच तसेच एक बाणी, एक पत्नी, एक वचनी होते. मातृ-पितृ भक्ती, बंधुप्रेम, सत्य वचन, असे अनेक आदर्श गुण त्यांच्यामध्ये होते. ज्या राज्यातील प्रजा अत्यंत सुखी आणि समाधानी असते अशा आदर्श राज्याला रामराज्य म्हणतात. आपण सगळेच राम राज्याची कल्पना करत असताना या सगळ्या गोष्टी ओघाने लक्षात घ्यायला हव्यात.

भगवान प्रभू रामचंद्र हे केवळ एक धार्मिक व्यक्तिमत्वच नाही तर ते योग्य जीवन जगण्याचे प्रतीक आहेत. त्यांचे जीवन- सत्य, नीतिमत्ता, कर्तव्य, त्याग आणि प्रेम यासारख्या सद्गुणांनी भरलेले होते. आपल्या जीवनात हे गुण आत्मसात करून आपण एक चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करूया.

रामावर भरवसा असल्याने आपण रामभरवसे शब्दप्रयोग करत असतो...आपल्या प्रत्येकाला आपले जीवन रामाचे चरणी समर्पित व्हावं असेच वाटत असते.

संकटे, दुःख दूर होणे साठी, सुखसमृद्धी, मनोकामना पूर्ण होण्यासाठी रामनामाचा जप आपण करा,पण त्याचबरोबर आदर्शांचा आदर्श राम म्हणत असतांना त्याचा काही तरी अंश,गुण आपल्यात उतरायला हवा.तरच. रामनामाचे जपाचे सार्थक होईल.

शेवटी....

''राम नाम उच्चरा जन्माचे सार्थक करा.
नामस्मरणे मुनिजन तरले..
तारक मंत्र जपा..
ॐ श्रीराम जय राम जय जय राम...
ॐ श्रीराम जय राम जय जय राम...
आनंदाचा आनंद राम.
श्रीराम जय राम जय जय राम....
त्रिभुवन तारक आहे राम
श्रीराम जय राम जय जय राम...
सर्वांना राम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा.!

**- दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा.८९९९५६६९१७**



जालना येथे मनसेचे नेते नितीन शिंगारे यांची बहीण सविता संजय करवंदे यांच्या निवासस्थानी रामनवमीनिमित्त श्रीराम लक्ष्मण सीता यांच्या मूर्तीला अशी पुष्पाद्वारे घरी सजावट आणि देखावा तयार करण्यात आल की स्थानिक नागरिकांनी पाहण्यासाठी गर्दी केली होती.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण पाऊलः पालक आता निश्चिंत

देशभरातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या गंभीर समस्येवर सर्वोच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक निकाल दिला असून, या निर्णयाचे नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी स्वागत केले आहे. ‘‘हा निकाल म्हणजे काळाची गरज होती. आता उच्च शिक्षणासाठी आपल्या पाल्याला घरापासून दूर पाठवणारे पालक निश्चिंत होऊ शकतील, कारण न्यायालयाच्या निर्देशांमुळे शिक्षण संस्थांमध्ये एक सुरक्षित आणि पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल,‘‘ असे मत ॲड. धन्नावत यांनी व्यक्त केले. अमित कुमार विरुद्ध भारतीय संघ या खटल्यात न्यायालयाने दिलेले निर्देश विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत.

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले की, शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसोबत कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक होते. सर्वोच्च न्यायालयाने आता प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेला विद्यार्थ्याची आत्महत्या किंवा अनैसर्गिक मृत्यूची घटना घडल्यास, ती कॅम्पसमध्ये असो वा बाहेर, तात्काळ पोलिसांना कळवणे बंधनकारक केले आहे. या निर्णयामुळे संस्थांची जबाबदारी वाढली असून, अशा घटनांना दाबून टाकण्याच्या प्रवृत्तीला आळा बसेल. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीविताला महत्त्व दिले जाईल आणि पालक आपल्या पाल्याच्या सुरक्षेबद्दल अधिक आश्वस्त होतील.

न्यायालयाने केवळ घटना घडल्यानंतरच्या उपाययोजनांवरच नव्हे, तर मूळ कारणांवरही लक्ष केंद्रित केले आहे. अनेक शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांची पदे वर्षानुवर्षे रिक्त असतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांवर प्रचंड शैक्षणिक ताण येतो. यावर तोडगा म्हणून, न्यायालयाने सर्व रिक्त पदे, विशेषतः आरक्षित प्रवर्गातील, चार महिन्यांच्या आत भरण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. कुलगुरू आणि कुलसचिव यांसारखी महत्त्वाची पदेही एका महिन्याच्या आत भरली जावीत, जेणेकरून संस्थांचे कामकाज सुरळीत चालेल आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

आर्थिक ताण हे विद्यार्थ्यांच्या मानसिक अस्वास्थ्याचे एक प्रमुख कारण असल्याचे लक्षात घेऊन न्यायालयाने शिष्यवृत्तीच्या विलंबावर कठोर भूमिका घेतली आहे. सर्व प्रलंबित शिष्यवृत्ती चार महिन्यांत वितरित करण्याचे आणि भविष्यात त्या वेळेवर देण्याचे निर्देश दिले आहेत. शिष्यवृत्ती मिळण्यास प्रशासकीय विलंब झाल्यास, विद्यार्थ्यांना शुल्क भरण्यास भाग पाडले जाऊ नये किंवा त्यांना परीक्षेला बसण्यापासून, वसतिगृहातून काढण्यापासून किंवा त्यांचे निकाल रोखण्यापासून रोखले जाऊ नये, असे न्यायालयाने बजावले आहे. हा निर्णय आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांतील विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा आहे.

शिक्षण संस्थांमधील रॅगिंग, लैंगिक छळ आणि भेदभावाच्या घटना रोखण्यासाठी न्यायालयाने विद्यमान नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. प्रत्येक संस्थेत रॅगिंग विरोधी समिती, लैंगिक छळाच्या तक्रारींसाठी अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि विद्यार्थी तक्रार निवारण समिती स्थापन करणे आणि त्या प्रभावीपणे कार्यरत ठेवणे बंधनकारक केले आहे. या समित्यांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी एक सुरक्षित व्यासपीठ मिळेल आणि त्यांच्या तक्रारींचे वेळेवर निराकरण होईल.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याला प्राधान्य देताना, प्रत्येक निवासी शिक्षण संस्थेत चोवीस तास वैद्यकीय मदत उपलब्ध असावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. तसेच, विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी पात्र आणि व्यावसायिक सल्लागारांची नेमणूक करण्यावर भर दिला आहे. विद्यार्थ्यांच्या गोपनीयतेचा आदर करत त्यांना मानसिक आधार देणारी यंत्रणा उभी करणे हे संस्थांचे कर्तव्य असेल.

एकंदरीत, सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे केवळ काही निर्देशांची यादी नसून, तो विद्यार्थी कल्याणासाठी एक सर्वसमावेशक आराखडा आहे. ॲड. धन्नावत यांच्या मते, या निर्देशांच्या अंमलबजावणीमुळे भारतातील उच्च शिक्षण प्रणाली अधिक सुरक्षित, न्याय्य आणि विद्यार्थी-केंद्रित बनेल. यामुळे देशाचे भवितव्य असणाऱ्या तरुण पिढीला भयमुक्त वातावरणात आपले शिक्षण पूर्ण करता येईल आणि त्यांचे पालकही त्यांच्या भविष्याबद्दल चिंतामुक्त राहतील.

# राजिप शाळा मांडवकर वाडी येथे निजामपूर केंद्रस्तरीय शिक्षण परिषद मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

**बोरघर । माणगांव** - निजामपूर केंद्राची शिक्षण परिषद मांडवकरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. अध्यक्ष स्थानी केंद्रप्रमुख तथा विस्तार अधिकारी मा. श्री. संजय पालांडे सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेले ईशस्तवन व स्वागतगीत यामुळे वातावरण भारावून गेले. दरम्यान चव्हाण सरांनी दिलेल्या ढोलकीच्या सुरेल साथीनं कार्यक्रमाला अधिक रंगत आली. मुख्याध्यापिका सौ. मगर मॅडम यांनी उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सह बदलत्या सर्व शैक्षणिक धोरणासाह परिषदेत विविध शैक्षणिक व प्रशासकीय विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

‘निपुण महाराष्ट्र’ या महत्त्वपूर्ण विषयावर सौ. शिवदे मॅडम यांनी मार्गदर्शन केले, तर ‘नमुना पाठ’ या विषयावर श्री. पोखरकर सर यांनी प्रभावी सादरीकरण केले. ‘’ संदर्भात सौ. लीना मगर मॅडम यांनी माहिती दिली. तसेच इयत्ता चौथी शिष्यवृत्ती बाबत नम्रता बडे मॅडम व इयत्ता सातवी शिष्यवृत्तीबाबत मिनल पोखरकर मॅडम यांनी मार्गदर्शन केले.



‘कार्यानुभव’ या विषयावर शिल्पा बांदल यांनी उपयुक्त माहिती मांडली.

या शिवाय उल्लास नवसाक्षर अभियान, विविध प्रशासकीय विषय, परिपत्रक वाचन, दाखलपात्र विद्यार्थी, आधार व अपार अपडेट यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर अध्यक्ष मा. पालांडे सर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. ही परिषद शिक्षकांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.

या परिषदेस निजामपूर केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. पोखरकर सर यांनी मांडवकरवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मगर मॅडम, सहशिक्षिका श्रीमती पाटील मॅडम तसेच उपस्थित सर्व शिक्षकांचे आभार मानले. अध्यक्षांच्या परवानगीने शिक्षण परिषद यशस्वीरित्या संपन्न झाल्याची घोषणा करण्यात आली.

# विक्रम गोखले यांची अखेरची कलाकृती ‘‘बेवारस‘‘ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

मराठी रंगभूमी, मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीतील महान अभिनेते, दिवंगत विक्रम गोखले यांचा अखेरचा चित्रपट आता प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अतिशय हृदयस्पर्शी कथा असलेला बेवारस हा चित्रपट आता लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर या चित्रपटाचं पोस्टर लाँच करण्यात आलं आहे. हरिणी प्रॉडक्शन्स निर्मित ‘‘बेवारस‘‘ या चित्रपटाची प्रस्तुती शिव आर्यन फिल्म्सनं केली आहे. हरिणी प्रॉडक्शन्सच्या रिया कुमार, नितीन विचारे यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे . चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन विजय राणे यांचं आहे.तर पटकथा, संवाद लेखन शिरीष लाटकर यांचे आहे. गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन विवेक आपटे, यूजीन डिसोझा आणि महेश कोळी यांनी छायांकन, अमीर हडकर यांनी पार्श्वसंगीत तर यश सुर्वे यांनी संकलन केलं आहे. चित्रपटात विक्रम गोखले यांच्यासह तेजस्विनी पंडित, रोहिणी हट्टंगडी, उषा नाईक, निहार गिते, ऋतुजा बागवे, उदय टिकेकर, विद्याधर जोशी, श्रीजित मराठे, आदित्य देशमुख यांच्या प्रमुख भूमिका आहेत. डोळे भरून आलेल्या विक्रम गोखले यांनी एका लहान मुलाला मिठी मारल्याचं चित्र पोस्टरवर आहे. पोस्टरप्रमाणेच चित्रपटाची कथा अत्यंत हृदयस्पर्शी आहे. अनाथालय चालवणाऱ्या तत्त्वनिष्ठ आबाजींची भूमिका विक्रम गोखले यांनी साकारली आहे. एक लहान अनाथ मुलगा आपल्या अधिकारांसाठी आपल्याच आई वडिलांना कोर्टात का खेचतो? त्या लहान मुलाच्या संघर्षाची अनोखी कथा या चित्रपटात दाखविण्यात आली असून सोबत




सामाजिक परिस्थितीचा पदरही या कथानकाला आहे. त्यामुळे विक्रम गोखले यांची अखेरची कलाकृती असलेल्या या चित्रपटाविषयी आता उत्सुकता निर्माण झाली आहे.

चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे.




# अशोक पांगारकर यांचा आयुक्त अशिमा मित्तल यांच्याकडून सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिकेचा स्थायी समितीचा चेअरमन पदी अशोक पांगारकर निवड झाल्याने जालन्याचे जिल्हाधिकारी तथा महानगर पालिकेचे आयुक्त अशिमा मितल याच्याकडुन सत्तकार करण्यात आला आज दि २४ मार्च रोजी जालन्याचे जिल्हाधिकारी तथा महानगरपालिकेचा आयुक्त आशिमा मित्तल महानगरपालिकेत बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत पांगारकर यांचा सत्कार करण्यात आला यावेळी जालना महानगरपालिकेचे महापौर वदना वमगरे भाजपचे नगरसेवक भास्कर दानवे नगरसेवक अक्षय गोरंट्याल स्वच्छता व आरोग्य कपिल भुरेवाल स्वच्छता व आरोग्य उपसभापती अनामिका विजय पांगारकर बांधकाम सभापती माया मनोज जोशी शिक्षण व विद्युत सभापती भाग्यश्री जोगस जालना महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम जालना महानगरपालिकेचे उपायुक्त नंदा गायकवाड सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण नगरसेविका पुजा दिनेश भगत नगर सेवक दुर्गेश काठोठीवाले शिवसेनेचे नगरसेवक निखिल पगारे यासह नगरसेवक अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



जालना काद्राबाद येथे गणगौर पूजन करतांना महिला तसेच फुगळी, झालावरणा, राजस्थानी गीत गायन केले. व मिरवणुकीच्या स्वागत महिलांनी रांगोळी टाकून पुष्पवृष्टी केले होते मोठ्या संख्येने महिला व पुरुषांची उपस्थिती होती. (छायाचित्र जावेद तांबोळी)

## दोनशेची मर्यादा नाही; सरकारचे स्पष्टीकरण

**जालना -** आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम झाला असून व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यातच, आता पेट्रोल-डिझेलची कमतरता असल्याचं सांगितलं जात असून सोशल मीडियावर पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याबाबत पसरत असलेल्या अफवांमुळे राज्यातील अनेक जिल्ह्यात जिल्हाभरातील पेट्रोल पंपांवर नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. राज्य सरकारकडूनही स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. पेट्रोल खरेदीवर ₹ २०० अशी स्थायी किंवा सार्वत्रिक मर्यादा लागू नाही, असे सरकारने स्पष्ट केले. जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा पुरवठा असून नागरिकांनी सुद्धा वाहनामध्ये अनावश्यक साठा करू नये

# जालना येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड रुद्र अभिषेक सप्ताहाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील कचेरी रोड परिसरातील प्राचीन वटवृक्ष हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त यंदाही अखंड रुद्र जलबारा अभिषेक सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. २६ मार्च ते गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ दरम्यान हा धार्मिक सोहळा भक्तिभावाने साजरा होणार असून, यावर्षीही मोठ्या संख्येने भाविकांच्या सहभागाची अपेक्षा आहे.

गेल्या सुमारे २९ वर्षांपासून अखंड परंपरेने सुरू असलेला हा धार्मिक उपक्रम स्वर्गीय वेदशास्त्रसंपन्न मोहन फुलंब्रीकर (पाठक) यांनी प्रारंभ केला होता. समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा आणि मानसिक भीती दूर करून धार्मिक व आध्यात्मिक प्रबोधन घडविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येतो.

या सप्ताहादरम्यान दिवसरात्र अकरा ब्राह्मणांच्या माध्यमातून गणपती, महादेव, देवी व हनुमान पंचायतन यांचे विधिवत पूजन, अथर्वशीर्ष, रुद्र, पवमान, चिंतन-मनन आदी धार्मिक विधी पार पडणार आहेत. तसेच जनकल्याण, नैसर्गिक आपत्ती निवारण, पितृदोष, कालसर्प दोष, नवग्रह बाधा आदी समस्यांच्या निवारणासाठी विविध धार्मिक विधी करण्यात येणार आहेत.

दररोज सायंकाळी ७ वाजता प्रदोष पूजेचे आयोजन करण्यात येणार असून, विविध समाजघटकांतील भाविक तन, मन, धनाने या कार्यक्रमात सहभागी होत आहेत. बालाजी महिला भजनी मंडळ यांच्यावतीने दररोज दुपारी ४ ते ६ या वेळेत भजन व सामूहिक गीता पठण होणार आहे.

या सप्ताहाचे यजमान म्हणून अ‍ॅड. संजय देशपांडे, राजेंद्र बारवाले, सुरेश अग्रवाल (शितल), भास्करराव दानवे, राजेश राऊत, अशोक पांगारकर, चक्रधर खोतकर, डॉ. संजय राख, डॉ. सबनीस, डॉ. निरज परितकर, वैद्य मंगल, शुक्लाजी, सत्यनारायण भारुकाजी, भाषेश पटेल, अरुण अग्रवाल, संजय अग्रवाल, राजेश सोनी, सुनील गोयल, अनिल गोयल, अ‍ॅड. तवरावाला, कुमार देशपांडे, जितेंद्र पित्ती, भवन लाड, राजेंद्र दायमा, श्रीपाद रत्नपारखी, भूपेश केनिया, अभय कुलकर्णी, संजय ख्रिस्ते, अ‍ॅड. जगदीश बडवे, अ‍ॅड. बलवंत नाईक, अ‍ॅड. विष्णुपंत किनगावकर यांच्यासह अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभत आहे.

तसेच वेदशास्त्रसंपन्न विनायक महाराज फुलंब्रीकर, विजय महाराज फुलंब्रीकर व भगवती पुरोहित संघाचे ब्रह्मवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक विधी पार पडणार आहेत. याशिवाय शालिकराम म्हस्के, अतुल वझरकर, अरविंद भोसले, महेश जोशी, दिनेश फलके, प्रल्हाद हरबक, श्रीनिवास इंदानी, महेश



रत्नपारखी, घिरल मेवाडे, लक्ष्मीकांत नाईक, शंकर तुंगे, अ‍ॅड. ललित हट्टेकर, आनंद मोहिदे, संजय भालेराव, गणेश सुपारकर, अजय गरड, मकरंद जहागिरदार, व्यंकट देशमुख, आदित्य जोशी, वेदांत फ ुलंब्रीकर आदींचा सहभाग आहे. हनुमान जन्मोत्सव दिनी, गुरुवार दि. २ एप्रिल रोजी दुपारी १ ते ४ या वेळेत महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हनुमान मंदिर वटवृक्ष संस्थान, प्राचीन जालना यांच्या वतीने सर्व भाविकांनी या धार्मिक सोहळ्यात सहभागी होऊन आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### भाजपा कार्यकर्त्यांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान

# घनसावंगीत दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**घनसावंगी । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीच्या वतीने घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील भाजपा कार्यकर्त्यांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी प्रशिक्षण महाअभियान-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. हे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर शनिवार, २८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता संजीवन ध्यान समाधान केंद्र, मच्छिंद्रनाथ चिंचोली (ता. घनसावंगी) येथे सुरू होणार आहे. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री तथा ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे व प्रदेश सचिव रेखा कुलकर्णी यांच्या यांच्या हस्ते संपन्न होईल. या कार्यक्रमाला भाजपा जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायणराव कुचे, माजी आमदार विलासबापू खरात यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती घनसावंगी विधानसभेचे निवडणूक प्रमुख सतीश घाटगे यांनी दिली.

पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान 2026 — सक्षम कार्यकर्ता सशक्त संगठन

घनसावंगी विधानसभेतील रांजणी, शहागड आणि घनसावंगी अशा तिन्ही मंडळातील कार्यकर्त्यांसाठी हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या निवासी शिबिरात पक्षाचा इतिहास, सरकारची कामगिरी, बूथ व्यवस्थापन, संघटन विस्तार तसेच सोशल मिडिया व एआय या विषयांवर विविध तज्ज्ञ वक्ते मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये दीपक भैया ठाकूर, डॉ. राजू निवृत्ती साळवे, राजेश मोरे आणि गोविंद ढेंबरे यांचा समावेश आहे. रविवार २९ मार्च रोजी सकाळी ११:०० वाजता माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थिती या शिबिराचा समारोप होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात वैचारिक अधिष्ठान आणि सोशल मीडिया, एआय () व नमो ॲप या तांत्रिक विषयांवर सुरेश केसापुरकर आणि विकास कदम हे मार्गदर्शन करतील.

पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांची शिदोरी प्रत्येक कार्यकर्त्यापर्यंत पोहोचवण्यासाठी हे शिबीर आयोजित करण्यात आले असून, या शिबिरात कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य संयोजक सतीश घाटगे पाटील यांनी केले आहे.

### दिवंगत शब्बीर अहमद अन्सारी यांच्या कुटुंबीयांची सांत्वन भेट

# समाजाने गमावले खंबीर नेतृत्व



**जालना । प्रतिनिधी -** मुस्लिम समाजासह ओबीसी चळवळीतील ज्येष्ठ व लढाऊ नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त करत, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट)च्या पदाधिकाऱ्यांनी दिवंगत शब्बीर अहमद अन्सारी यांच्या कुटुंबीयांची सांत्वन भेट घेतली. जालना शहरातील राहुल नगर, जुना जालना येथे अन्सारी यांच्या निवासस्थानी ही भेट देण्यात आली. या प्रसंगी डॉ. निसार अहमद देशमुख (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गट) यांनी अन्सारी कुटुंबीयांचे दुःख हलके करण्याचा प्रयत्न करत आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी दिवंगत अन्सारी यांच्या सुपुत्र इलीयास अन्सारी आणि एजाज अन्सारी यांची भेट घेऊन सांत्वन केले.

यावेळी आमदार चंद्रकांत आण्णा दानवे पाटील, आमदार संजय वाघचौरे, शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख, तसेच पंकज नाना बोराडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

**समाजाने गमावले खंबीर नेतृत्व**

सांत्वनपर मनोगत व्यक्त करताना डॉ. निसार देशमुख म्हणाले की, ''शब्बीर अन्सारी साहेब यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने केवळ मुस्लिम समाज नव्हे, तर संपूर्ण ओबीसी आणि वंचित समाजाने एक खंबीर, स्पष्टवक्ता आणि लढाऊ नेतृत्व गमावले आहे.''

**सामाजिक न्यायासाठी आयुष्यभर संघर्ष**

दिवंगत शब्बीर अहमद अन्सारी हे ऑल इंडिया महात्मा फुले समता परिषद चे राज्य सरचिटणीस तसेच ऑल इंडिया ओबीसी मुस्लिम ऑर्गनायझेशन चे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांनी आयुष्यभर सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष केला. त्यांचे कार्य केवळ एका समाजापुरते मर्यादित न राहता सर्व वंचित, मागास आणि दुर्लक्षित घटकांच्या हितासाठी होते. त्यामुळे ते जालना जिल्ह्याचे भूषण आणि खऱ्या अर्थाने भूमिपुत्र म्हणून ओळखले जात होते.

अन्सारी साहेबांनी समाजात एकात्मता आणि समतेचा संदेश देत विविध स्तरांवर काम केले. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेकांना न्याय आणि हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा मिळाली.

या वेळी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी अन्सारी कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत, ''या दुःखद प्रसंगी आम्ही संपूर्ण पक्ष आणि कार्यकर्ते अन्सारी परिवारासोबत ठामपणे उभे आहोत,'' असे सांगितले. अन्सारी साहेबांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी असून, त्यांच्या कार्याची परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी आता समाजावर असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## अशोक खरातचे व्हिडीयो व्हायरल करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार

**नाशिक -** भोंदू अशोक खरात प्रकरणात आता पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पीडित महिलांचे आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी नाशिकच्या सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात यापूर्वी एक गुन्हा दाखल असताना आता दुसऱ्यांदा गुन्हा नोंदवण्यात आल्याने पोलिसांची कारवाई अधिक कडक होत असल्याचं दिसत आहे.




## मुबलक साठा, मोठ्या प्रमाणातील रांगा प्रशासनापुढे आवाहन...

**प्रशासनाकडून मुबलक प्रमाणात पेट्रोल-डिझेल सह गॅस उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. असे असले तरी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात पंपावर गर्दी होत आहे. मोठ्या प्रमाणात रांगा दिसून येत आहे. नागरिकांना पेट्रोल-डिझेल संपणार असल्याची भीती निर्माण झालेली आहे. प्रशासन वेळोवेळी आवाहन करत आहे. मात्र, नागरिकांना प्रशासनाच्या आवाहनावर नागरिकांना विश्वास निर्माण होत नसल्याने प्रशासनापुढे मोठे आवाहन निर्माण झाले आहे. (छायाचित्र किरण खानापुरे)**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.